**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री. बजरंग बाबूराव गुरमे
रा. यलमवाडी, पो. देगाव, ता. मोहोळ,
जि. सोलापूर

अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) वि.क्र.१,
जिल्हा परिषद, सोलापूर

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक अभियंता (श्रेणी-१),
लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर)
उपविभाग, मोहोळ, जि. सोलापूर
श्री. पंढरीनाथ बाबूराव भोसले

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७ /८/२००७ |

३ उपस्थित

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर) वि.क्र.१, जिल्हा परिषद, सोलापूर तर्फे प्रतिनिधी श्री. मधुकर केरु गोडगे, अधीक्षक, पंचायत समिती, मोहोळ, जि. सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता (श्रेणी-१), लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग मोहोळ, जि. सोलापूर श्री. पंढरीनाकथ बाबूराव भोसले

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २.५.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :** ऑक्टोबर २००३ ते २००५ या कालावधीत यलमवाडी गावातील रोजगार हमी योजना अंतर्गत ३ पाझर तलाव त्यावरील मंजूर रक्कम, खर्च पडलेली रक्कम व शिल्लक आणि मजुरांच्या हजेरी पत्रकाच्या झेरॉक्स प्रती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. बजरंग बाबूराव गुरमे यांनी यलमवाडी गावातील रोजगार हमी योजने अंतर्गत पाझर तलावांच्या कामावर झालेला एकूण खर्च व हजेरी पत्रकाच्या छायांकित प्रती अशी माहिती जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (श्रेणी १), लघुपाट बंधारे (स्थानिक स्तार), उपविभाग मोहोळ, यांच्याकडे मागितली होती. त्यांच्याकडून माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर), वि.क्र.१, जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे अपील केले होते. त्यांच्याकडूनही अपिलाची दखल घेतली गेली नाही म्हणून श्री. गुरमे

यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे. दरम्यानच्या काळात तालुका स्तरावरील माहिती अधिकारी म्हणून तालुक्याचे उपअभियंता व अपिलीय प्राधिकारी म्हणून गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मोहोळ यांची नियुक्ती करण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांनी काढले होते. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, लघु पाटबंधारे उपविभाग, (स्थानिक स्तर), यांच्याकडून आपल्याला आवश्यक असलेली माहिती मिळाली त्यामुळे आपली तक्रार राहिली नसल्याचे श्री. गुरमे यांनी लेखी निवेदनात नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

पुणे
दि. ९.८.२००७

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री. प्रभाकर मारुती कोंढाळकर,
बी-१, मुक्तानंद हौसिंग सोसायटी, — अपीलकर्ता
चव्हाणनगर, धनकवडी, पुणे - ४३

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
उपविभागीय कृषि अधिकारी, पुणे — उत्तरवादी
श्री. जी. पी. परजणे

जन माहिती अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी, भोर
श्री. अरुण मालसिंग

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७५ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३.६.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. प्रभाकर मारुती कोंढाळकर, बी-१, मुक्तानंद हौसिंग सोसायटी, चव्हाणनगर, धनकवडी, पुणे - ४३

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय कृषि अधिकारी, पुणे श्री. जी. पी. परजणे

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका कृषि अधिकारी, भोर यांचे वतीने
कृषि अधिकारी, भोर श्री. रा. द. अकोलकर
मंडल कृषि अधिकारी, नसरापूर श्री. व्ही. एन. शिळीमकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९.११.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३.२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :**

मौजे कांबरे (खे.बा.) येथील श्री. देवीचंद पूनमचंद बागमार यांच्या शेतावर कृषि खात्याने राबविलेल्या प्रकल्पांबाबत श्री. उत्तम बबनराव कोंढाळकर यांनी ९.११.२००६ रोजी माहिती मागितली, त्या पत्रावर पुढे काय कारवाई करण्यात आली याची सविस्तर माहिती, तसेच नमूद मिळकतीवर सन १९९२ पासून जे काही प्रकल्प राबविण्यात आले त्या सर्व प्रकल्पांची सही, शिक्का व नकाशासह माहिती

## विवेचन

मौजे कांबरे खे.बा. (खेबा) येथील श्री. देवीचंद पूनमचंद बागमार यांच्या शेताचा गट क्र. ६२३ मध्ये तालुका कृषि अधिकारी कार्यालयामार्फत १९९२ पासून राबविण्यात आलेल्या प्रकल्पाची माहिती श्री. उत्तम बबन कोंढाळकर यांनी नकाशासह मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, भोर, ता. भोर, जि. पुणे यांनी ही माहिती त्वरित देण्याचे आदेश संबंधित मंडल कृषि अधिकारी, नसरापूर यांना दिले. त्यावर मंडल कृषि अधिकारी, नसरापूर यांनी दि. २१.११.२००६ रोजी काही माहिती दिली, परंतु ती अपुरी असल्याचे नमूद करुन त्या अर्जावरील कार्यवाहीची व पूर्ण माहितीची मागणी करणारा अर्ज अपीलकर्ता श्री. प्रभाकर कोंढाळकर यांनी गट विकास अधिकारी, भोर यांच्याकडे केला होता.

पंचायत समितीच्या गट विकास अधिकाऱ्यांनी ही माहिती कृषि अधिकारी, भोर यांच्याकडून मिळणे अपेक्षित असल्याचे कळविले व विहित मुदतीत माहिती देण्याच्या सूचना तालुका कृषि अधिकारी, भोर, ता. भोर यांना दिल्या. परंतु आपल्याला अपेक्षित माहिती कोणाकडूनही न मिळाल्याचे दि. ३.२.२००७ रोजी त्यांनी नमूद करुन अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय कृषि

अधिकारी, जि. पुणे यांच्याकडे अपील केले. त्याची दखल घेतली न गेल्यामुळे श्री. प्रभाकर कोंढाळकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि. ४.४.२००७ रोजी अपील दाखल केले आहे.

विविध अधिकाऱ्यांकडे केलेल्या अर्जानुसार आपल्याला माहिती मिळालेली नाही, वारंवार चकरा माराव्या लागल्या याचा मनःस्ताप होतो आणि तरीही तपशीलवार माहिती दिली जात नाही असे श्री. प्रभाकर कोंढाळकर यांनी आयोगापुढील सुनावणीत नमूद केले. मंडल कृषि अधिकारी, भोर यांनी दि. २१.११.२००६ रोजी व दि. ७.४.२००७ रोजी दिलेली माहिती दिशाभूल करणारी आहे. तसेच कृषिविभागाची पुनर्रचना झाल्यामुळे, कार्यालयीन अभिलेखाचे हस्तांतरण झाल्यामुळे मागणी केलेले नकाशे अभिलेखामध्ये उपलब्ध नाहीत असे कळविले आहे, असे श्री. प्रभाकर कोंढाळकर यांनी नमूद केले आहे. ग्रामीण भागामध्ये विविध योजनांमध्ये शेतकरी वर्गाची दिशाभूल करुन पिळवणूक केली जाते, त्याचे हे उदाहरण आहे, असा त्यांचा आरोप आहे. संबंधित जागेवर फळबाग लागवड केल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली असली तरी झाडांची संख्या, झालेला खर्च आदि तपशीलवार माहिती दिली जात नाही. तसेच प्रत्यक्ष जागेवर झाडे आढळली नाहीत, असे श्री. प्रभाकर कोंढाळकर यांनी निदर्शनास आणले. असे प्रकार आढळले तेथे कृषि खात्याने शेतकऱ्यांना वसुलीच्या नोटिसा दिल्या, परंतु शासनाने ही वसुली माफ केली, असे उपविभागीय कृषि अधिकारी, पुणे श्री. जी.पी. परजणे व तालुका कृषि अधिकारी, भोर श्री. अरुण मालसिंग यांनी सांगितले. तसेच संबंधित लागवडीचा नकाशा नसतो, असेही त्यांनी स्पष्ट केले. प्रथम अपिलाची सुनावणी न करण्यात चूक झाल्याचे श्री. परजणे यांनी मान्य केले. श्री. प्रभाकर कोंढाळकर यांनी दि. ६.१२.२००६ रोजी माहिती मागणारा अर्ज केला. त्याचे उत्तर मंडल कृषि अधिकारी, नसरापूर श्री. व्ही.एन. शिळीमकर यांनी दि. ७.४.२००७ रोजी दिले आहे. माहिती देण्याबाबतची अनास्था व कायद्याचे पालन करण्याबाबत पुरेशी दक्षता न घेतल्याचे त्यातून स्पष्ट होते. मात्र तत्कालीन परिस्थितीमुळे विलंब झाला असून आपण संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून माहिती मिळवून देण्याचा प्रयत्न केला, असे नमूद करुन त्याला पुष्टी देणारी कागदपत्रे श्री. शिळीमकर यांनी सादर केली. हे सर्व प्रयत्न लक्षात घेऊनही अपुरी व विलंबाने माहिती देण्याबद्दल संबंधितावर दंडात्मक कारवाई होणे आवश्यक आहे.

उभय बाजूंची निवेदने व संबंधित कागदपत्रे लक्षात घेता आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

१. अपील मान्य.

२. मागितलेली माहिती तीन दिवसात व निःशुल्क द्यावी, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. त्याबाबतचा पूर्तता अहवाल जन माहिती अधिकाऱ्यांनी दि. ५.९.२००७ पर्यंत आयोगाला सादर करावा.

३. अपुरी व विलंबाने माहिती दिल्याबद्दल रु. ५०००/- शास्ती लावण्यात येत आहे. उपविभागीय कृषि अधिकारी, श्री. जी.पी. परजणे यांनी याबाबतची संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करुन सम प्रमाणात शास्ती माहे ऑगस्ट २००७ च्या वेतनातून वसूल करावी. सदरची शास्ती '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१ ) ' या लेखाशिर्षाखाली जमा करावी. दि. १०.९.२००७ पर्यंत आयोगाला तसा पूर्तता अहवाल सादर करावा.

४. प्रथम अपिलाची सुनावणी न केल्याबद्दल आयोग नापसंती व्यक्त करीत असून उपविभागीय कृषि अधिकारी श्री. जी.पी.परजणे यांना याबद्दल समज देण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे विभाग, पुणे**

**पुणे**
**दि. २३.८.२००७**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री. नंदलाल लालचंद चौधरी,
३३ बी, गवळीवाडा, लोणावळा, अपीलकर्ता
ता. मावळ, जि. पुणे

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
उप आयुक्त, (सामान्य प्रशासन ) उत्तरवादी
पुणे विभाग, पुणे
श्री. टी. जी. कासार

जन माहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी, लोणावळा नगरपालिका,
ता. मावळ, जि. पुणे
डॉ. सुनिल लहाने

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७६ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १४.६.२००७ |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. नंदलाल लालचंद चौधरी, ३३ बी, गवळीवाडा, लोणावळा, ता. मावळ, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त, (सामान्य प्रशासन ) पुणे विभाग, पुणे
श्री. टी. जी. कासार

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी, लोणावळा नगरपालिका, ता. मावळ, जि. पुणे
डॉ. सुनिल लहाने

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६.१०.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ५.८.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १९.९.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६.१२.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :**<br>लोणावळा येथील गवळीवाडा विभागात स.क्र. २८४ ( भाग), सिटी सर्व्हे क्र.१३४ ( भाग) या जागेवर निवासी वापरासाठी बांधकामाला परवानगी मिळण्याकरिता दि. १६.१०.२००५ रोजी अर्जावर केलेली कार्यवाही महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६, कलम ४४ व ४५ (५) बाबतचा खुलासा. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. नंदलाल लालचंद चौधरी यांनी लोणावळा येथील गवळीवाडा विभागात करावयाच्या बांधकामाचा नकाशा सादर करुन स.क्र. २८४ ( भाग), सिटी सर्व्हे क्र.१३४ ( भाग) या जागेवर निवासी वापरासाठी बांधकामाला परवानगी मिळण्याकरिता दि. १६.१०.२००५ रोजी अर्ज दाखल केला होता. त्याला विशिष्ट मुदतीत परवानगी न मिळाल्यास महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६, कलम ४५ (५) नुसार मंजुरी ग्राह्य धरुन काम सुरू करावे, असे श्री. चौधरी यां म्हणणे आहे. परंतु श्री. चौधरी यांचे वास्तुविशारद मे. पारख असोसिएट्स यांनी बांधकाम परवानगी प्रस्तावातील त्रुटींची पूर्तता करुन सुधारित प्रस्ताव सादर करेपर्यंत प्रकरण प्रलंबित ठेवावे, अशी विनंती केल्यामुळे ते प्रलंबित ठेवण्यात आले असल्याचे व दि. २५.१.२००६ रोजीच्या पत्रानुसार प्रकरण नामंजूर करण्यात आल्याचे श्री. चौधरी यांना कळविण्यात आले आहे. त्यामुळे परवानगी गृहीत धरणे योग्य नाही, असे जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, लोणावळा नगरपरिषद यांनी त्यांना कळविले. त्याविरुध्द श्री. चौधरी यांनी अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन), पुणे विभाग, पुणे यांच्याकडे अपील दाखल केले. अपिलार्थी यांनी कोणतेही लेखी म्हणणे व पुरावे सादर केले नाही, असे कारण नमूद करुन अपिलीय प्राधिका-यांनी त्यांचे अपील फेटाळले.

त्याविरुध्द श्री. चौधरी यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे. दि. ८.५.२००७ रोजी त्याची सुनावणी ठेवण्यात आली होती, परंतु फक्त अपीलकर्ता उपस्थित राहिले. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी उपस्थित नव्हते. (आपल्याला सुनावणीची सूचना प्राप्त झाली नसल्याचे त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी सांगितले.) म्हणून दि. १३.६.२००७ रोजी पुन्हा सुनावणी ठेवण्यात आली. त्यावेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी उपस्थित होते. अपीलकर्ता अनुपस्थित असले तरी त्यांनी आपले म्हणणे लेखी निवेदनद्वारे सविस्तर सादर केले.

श्री. चौधरी यांनी बांधकामास परवानगी मागितलेली जागा लोणावळा शहराच्या मंजूर विकास योजना (दुसरी) मधील असून विकास नियंत्रण नियमावलीप्रमाणे निवासी वापराला तेथे मान्यता नाही. त्यामुळे नगर परिषदेने तेथील बांधकामास परवानगी नाकारली. 'या विकास योजनेमध्ये स.क्र. २८४ (भाग), सिटी स.क्र.१३४/ए, वॉर्ड-बी या जागेबाबत दर्शविलेल्या विभागामध्ये आरेखनातील चूक (Drafting Error) असल्याचे नगर रचना विभागाच्या संचालकांनी मान्य केले असून ही चूक दुरुस्त करण्याची तरतूद विकास नियंत्रण नियमावलीत समाविष्ट आहे,' असे जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, लोणावळा नगरपरिषद यांनी दि. ५.८.२००६ रोजी श्री. चौधरी यांना पाठविलेल्या पत्रात स्पष्ट केले आहे. त्यानंतर, श्री. चौधरी यांच्या वतीने पारख असोसिएट्स यांनी दि. ४.११.२००६ रोजी सादर केलेल्या रहिवास वापरासाठी बांधकामास मंजुरी देण्याबाबतचा प्रस्ताव, जागा पाहणी अहवाल व सविस्तर छाननी अहवाल यासह सविस्तर पत्र दि. २९.११.२००६ रोजी मुख्याधिकारी, लोणावळा नगरपरिषद यांनी संचालक, नगर रचना, पुणे यांना पाठविले. त्याचवेळी 'जागेवर कोणतेही बांधकाम करु नये, या प्रस्तावामध्ये विहित साठ दिवसांची मुदत लागू राहणार नाही,' असे त्यांनी श्री. चौधरी यांना कळविले. महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ४४ नुसार नगर रचना विभागाच्या तरतुदीनुसार योग्य असेल तरच प्रस्ताव स्वीकारावा असे बंधन आहे, तर अशा प्रस्तावाबाबत ६० दिवसात काही कळविले गेले नाही तर परवानगी दिली गेली आहे असे गृहीत धरावे, (Deemed permission) असे महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ४५ (५) मध्ये म्हटले आहे. त्यानुसार आपल्याला काम सुरु करण्याचे प्रमाणपत्र दिले जाणे आवश्यक आहे, असा श्री. चौधरी यांचा दावा आहे. हा अन्वयार्थ उभय बाजूंमधील मतभेदाचा विषय आहे. संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना मुख्याधिकारी, नगर परिषद, लोणावळा यांनी विभाग

दर्शवण्यातील चूक दुरूस्त करण्याविषयी प्रस्ताव सादर केलेला आहे, दुरुस्तीच्या या प्रस्तावावर अद्याप निर्णय प्राप्त झाला नसल्याचे मुख्याधिकारी, लोणावळा नगरपरिषद डॉ. सुनिल लहाने यांनी दि. १४.६.२००७ रोजी सुनावणीच्या वेळी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे. अशा प्रकारच्या दप्तर दिरंगाईमुळे आपले मोठे नुकसान होत आहे, असे श्री. चौधरी यांचे म्हणणे आहे.

कायद्यातील कलमांचा अन्वयार्थ हा राज्य माहिती आयोगापुढील विषय नाही. 'संचालक, नगररचना यांचेकडे पाठविलेल्या प्रकरणांचे बाबतीत महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, ४५(५) नुसार ६० दिवसांची मुदत लागू होत नाही, या जन माहिती अधिकाऱ्यांच्या विधानाबाबत आवश्यक तर अपिलार्थींनी प्रथम संचालक, नगर रचना यांचेकडून खुलासा / मार्गदर्शन घेणे संयुक्तिक झाले असते,' असे तत्कालीन अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

श्री. चौधरी यांना नगरपरिषदेने आवश्यक ती माहिती दिली आहे. परंतु त्यांचा मुख्य प्रश्न महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, ४५(५) च्या अन्वयार्थानुसार निवासी बांधकामाला परवानगी मिळण्याचा आहे. तो या आयोगाच्या कक्षेतील विषय नाही. सबब, आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

**<u>आदेश</u>**

१. अपील अमान्य.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे विभाग, पुणे**

**पुणे**
**दि. २३.८.२००७**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री. प्रमोद नारायण देसाई,
स.नं.६, प्लॉट नं.७/११, हि.नं.१/७,
कॅनॉलखाली, गल्ली नं.३ समोर,
कर्वेनगर, पुणे - ४११ ०५२

अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
नगर अभियंता, पुणे महानगरपालिका,
पुणे-४११ ००५

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
विकास अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग,
पुणे महानगरपालिका, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १३.६.२००७ |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे-५ श्री. शांताराम खंडेराव थोरात

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.१०.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०.११.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २८.११.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १२.१२.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :** गुंठेवारी नियमितीकरणाविषयी दि. १९.६.२००६ व दि. २३.८.२००६ रोजी दिलेल्या पत्रांप्रमाणे संबंधितावर कारवाई केलेल्या निर्णयाची प्रत | |

## विवेचन

कर्वेनगर, पुणे येथील स.क्र. ६, प्लॉट क्र. ७/११, हिस्सा क्र.१/७ बाबत गुंठे नियमितीकरणाविषयी आपण दि. १९.६.२००६ व २३.८.२००६ रोजी दिलेल्या पत्रावर काय कारवाई झाली याविषयीची माहिती अपीलकर्ता श्री. प्रमोद नारायण देसाई यांनी जन माहिती अधिकारी तथा विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण, पुणे महानगरपालिका यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिका-यांनी दिलेली माहिती चुकीची असल्याचे व विहित मुदतीत न मिळाल्याचे नमूद करुन श्री. देसाई यांनी अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता, पुणे महानगरपालिका यांच्याकडे अपील केले. 'श्री. देसाई यांनी लोकशाही दिनात व अन्य प्रकारे दिलेल्या संदर्भीय पत्रांमध्ये कर्वेनगर स.क्र. ६, प्लॉट क्र. ७/११, हिस्सा क्र. १/७ बाबतची गुंठेवारी नियमितीकरणाविषयी माहिती मागितली होती. ती त्यांना यापूर्वीच देण्यात आली आहे,' असे नमूद करुन अपिलीय प्राधिका-यांनी त्यांचे अपील फेटाळ याविरुध्द श्री. देसाई यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

स.क्र. ६, प्लॉट क्र.७/११, गल्ली क्र.३ समोर, कर्वेनगर, पुणे येथे श्री. देसाई राहत असून त्यालगत श्री. ससाणे, श्री. राठोड व श्री. सापरिया यांच्या नावाने खरेदीखत सादर करुन गुंठेवारी करुन घेतलेला भूखंड या सदंर्भातील हा विषय आहे. हे खरेदीखत खोटे व संगनमताने करण्यात आले असून श्री. ससाणे, श्री. राठोड व श्री. सापरिया यांना देण्यात आलेले गुंठेवारी प्रमाणपत्र रद्द करावे व ते आपल्या नावे करावे, अशी मागणी श्री. देसाई सन २००१ सालापासून करीत आहेत. विविध प्रकारच्या व विविध अधिका-यांकडील अर्जांमधून ते हा विषय मांडत आहेत. संबंधित अधिका-यांनी त्या त्या वेळी त्यांना

उत्तरही दिले आहे. लगतच्या प्लॉटमधील बांधकामामुळे आपल्या बाथरुम व टॉयलेटला हवा जाण्यास जागा राहिलेली नाही, अशी तक्रारही त्यांनी सातत्याने नमूद केली आहे.

'अर्जदार व त्यांनी तक्रार केलेली अशा दोन्ही इमारती अनधिकृत आहेत, या दोन्ही इमारतींचे नियमितीकरणासाठीचे प्रस्ताव दाखल आहेत. अर्जदाराने तक्रार केलेल्या इमारतीचे मालक श्री. ससाणे, श्री. सापरिया व श्री. राठोड यांची इमारत स.नं.६, हिस्सा क्र.७+११ / १ + ७, कर्वेनगर ही गुंठेवारी अधिनियमानुसार निकषांप्रमाणे नियमान्वित करण्यात आली आहे, सदर इमारतीचे बांधकाम जानेवारी, २००१ पूर्वीच झाले असल्याने, तसेच गुंठेवारी नियमानुसार नियमितीकरणास पात्र असल्याने त्यावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

'अर्जदाराचे स्वत:चे घराचे बांधकाम अनधिकृत आहे. अर्जदाराने त्यांचे घराचे संडास बांधताना स्वत:च्याच प्लॉटमधून हवा उजेड मिळण्याची व्यवस्था करणे आवश्यक होते. परंतु त्याने ते न करता स्वत:चा प्लॉट हद्दीपर्यंत बांधकाम केले आहे. तसेच मागील इमारतीचे जागा मालकांनी त्यांच्या इमारतीचे बांधकाम करताना ते प्लॉट हद्दीपर्यंत केले आहे. ही दोन्ही बांधकामे सन २००१ पूर्वीपासून अस्तित्वात आहेत. श्री. ससाणे, श्री. सापरिया व श्री. राठोड यांचे बांधकाम गुंठेवारी अधिनियमानुसार नियमितीकरणास पात्र असल्याने त्यांचे नियमितीकरण करण्यात आले आहे. त्यामुळे अर्जदाराच्या तक्रारीवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही,' असे जन माहिती अधिकारी तथा सह आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी दि. २७.७.२००४ रोजीच्या पत्रान्वये त्यांना कळविले आहे. महापालिकेने सातत्याने हीच माहिती त्यांना कळविली आहे. त्या संदर्भातील पत्रव्यवहार व अन्य कागदपत्रे जन माहिती अधिकारी तथा विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण, पुणे महानगरपालिका यांनी सुनावणीच्या वेळी आयोगाला सादर केली.

आपण मागितलेली माहिती व कागदपत्रे मिळाली नाही असे नमूद करुन श्री. देसाई यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलात पुढीलप्रमाणे मागणी वजा विनंती केली आहे :

'मी वरील पत्त्यावर रहात असलेल्या जागेची गुंठेवारी झालेली असून सदरील जागा ही परस्पर पुणे महानगरपालिकेने श्री. ससाणे, श्री. राठोड व श्री. सापरिया यांच्या नावाने खोटे खरेदीखत दाखल करुन घेऊन माझे जवळपास १८ ते २० लाख रुपयांचे नुकसान केलेले आहे. तरी सदरील जागा, कागदपत्रे, कायदेशीर ताब्यात देऊन माझी नुकसान भरपाई देण्याचे आदेश द्यावेत.'

संबंधित माहिती श्री. देसाई यांना वारंवार देण्यात आली असून आवश्यक त्या संचिका अवलोकनासाठी उपलब्ध असल्याचेही कळविण्यात आले आहे, असे जन माहिती अधिकारी तथा विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण, पुणे महानगरपालिका श्री. शांताराम खंडेराव थोरात यांनी सांगितले. 'प्रकरण पाहिले. मागणी केलेली सर्व आवश्यक कागदपत्रे मिळाली. सबजेक्ट टू कंडिशन,' असे श्री. देसाई यांनी दि. ६.३.२००७ रोजी लेखी दिल्याची प्रतही श्री. थोरात यांनी आयोगाला सादर केली.

श्री. देसाई हे आयोगापुढील सुनावणीला उपस्थित नसले तरीही विस्ताराने त्यांचे म्हणणे मांडणारी कागदपत्रे त्यांनी सादर केली आहेत.

श्री. देसाई यांनी केलेले विविध अर्ज व त्यांना पुणे महानगरपालिकेकडून देण्यात आलेली उत्तरे पाहाता माहितीच्या मागणीपेक्षा संबंधित खरेदीखत व गुंठेवारी नियमितीकरणा संबंधीचा वाद व [illegible] अनुषंगाने असलेल्या तक्रारी हा श्री. देसाई यांचा मूळ विषय आहे. संगनमताने खोटे खरेदीखत केले असल्याचा त्यांचा आरोप आहे. संबंधित जागा व कागदपत्रे आपल्याला मिळून नुकसान भरपाई मिळावी, अशी त्यांची मागणी आहे. या सर्व बाबी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील नाहीत. आवश्यक माहिती त्यांना दिली गेली आहे, मात्र त्यांचा अर्ज दि. २०.१०.२००६ चा असून पूर्ण माहिती दि. ६.३.२००७ रोजी दिली गेली आहे. माहितीचा अधिकार अधिनियमात नमूद केल्याप्रमाणे ती तीस दिवसाच्या मुदतीत देणे आवश्यक आहे. परंतु दरम्यानच्या काळात याच विषयावरील त्यांच्या विविध अर्जांना सातत्याने उत्तरे दिली आहेत. त्यामुळे विलंब मानण्यात येऊ नये, अशी विनंती जन माहिती अधिकारी श्री. थोरात यांनी केली. त्यांनी सादर केलेल्या अनुषंगिक कागदपत्रांवरुन त्यांचे म्हणणे [illegible] असल्याचे दिसून येते, म्हणून विलंब क्षमापित करण्यात येत आहे.

वरील पार्श्वभूमी लक्षात घेता आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

पुणे
दि. १६.८.२००७

राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे.१

श्री. हणमंतराव तुकाराम गायकवाड,
घर नं.१८३८, रामवाडी, सोलापूर - ४१३ ००१ अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
कुलसचिव, उत्तरवादी
महात्मा फुले कृषि विद्यापीठ,
राहुरी, जि. अहमदनगर
श्री. राजेंद्रकुमार बी. पाटील

जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक कुलसचिव (प्रशासन),
महात्मा फुले कृषि विद्यापीठ,
राहुरी, जि. अहमदनगर
श्री. विश्वास बळवंत जाधव

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८२ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७.८.२००७ |

३. उपस्थित

**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ,
राहुरी, जि. अहमदनगर श्री. राजेंद्रकुमार बी. पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक कुलसचिव (प्रशासन),
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जि. अहमदनगर
श्री. विश्वास बळवंत जाधव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७.३.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २१.४.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ६.५.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :**<br>कृषि विद्यापीठ राहुरी अंतर्गत दि. ८.७.१९७५ पासून सहाय्यक व अधीक्षकपदी कार्यरत असताना. विमुक्त व भटक्या जातीच्या प्रवर्गातून आरक्षणातील , अधीक्षक पदासाठी पदोन्नतीस पात्र असताना प्रशासनाने कोणत्या सेवानियमान्वये डावलण्यात आले.<br>श्री. एम. एस. वाडगावे यांना पदोन्नती दिली, हे आदेश कोणत्या सेवानियमान्वये ग्राह्य होते, श्री. वडगावे यांच्या जातीचे प्रमाणपत्र ग्राह्य होते का ?<br>श्री वडगावे यांचे पदोन्नतीचे आदेश दि २४.२.१९८४ पासून रद्द करावे. | |

## विवेचन

भटक्या व विमुक्त जातीच्या प्रवर्गातून आरक्षणातील पदोन्नतीला आपण पात्र असतानाही प्रशासनाने आपल्याला डावलले व श्री. एम. एस. वाडगावे यांना पदोन्नती दिली, हे आदेश कोणत्या सेवानियमान्वये ग्राह्य होते, आपल्याला कोणत्या सेवानियमान्वये डावलण्यात आले, श्री. वडगावे यांच्या जातीचे प्रमाणपत्र ग्राह्य होते का अशा स्वरुपाची माहिती श्री. हणमंतराव तुकाराम गायकवाड

यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक उपकुलसचिव (प्रशासन), महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जि. अहमदनगर यांच्याकडे मागितली होती. तत्कालीन सहाय्यक जन माहिती अधिकारी सहाय्यक कुलसचिव (प्रशासन) श्री. आय. आर. सडोलकर यांनी त्याबाबतची सविस्तर माहिती त्यांना कळविली. श्री. वडगावे सेवाज्येष्ठ असल्यामुळे त्यांना पदोन्नती देण्यात आली, तसेच १९९१ पर्यंतच्या नियमानुसार मागासवर्गीयांचे जातीचे दाखले देण्याचे अधिकार तहसीलदारांना असल्यामुळे कार्यकारी दंडाधिकारी करवीर, जि. कोल्हापूर यांनी त्यांना दिलेले जातीचे प्रमाणपत्र निवड समितीने ग्राह्य मानले आहे. तसेच श्री. गायकवाड यांचे १९९०-९१ चे गोपनीय अहवाल प्रतिकूल असल्याने कालबध्द पदोन्नतीस संबंधित समितीने त्यांना अपात्र ठरविले आहे, असे या पत्रात स्पष्ट केले आहे. तसेच श्री. वडगावे यांच्या जात पडताळणी प्रमाणपत्राबाबत सुरु असलेल्या पत्रव्यवहाराची माहितीही त्यांनी या पत्रात दिली आहे. जन माहिती अधिका-यांच्या या निर्णयाविरुध्द श्री. गायकवाड यांनी अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी श्री. राजेंद्रकुमार पाटील यांच्याकडे अपील केले. त्यांच्या निर्णयाविरुध्द श्री. गायकवाड यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे. श्री वडगावे यांच्या पदोन्नतीचा आदेश रद्द करण्याचा आदेश कुलसचिवांना आयोगाने द्यावा, तसेच त्या पदी आपली नियुक्ती करावी, अशी मागणी त्यानी अपिलात व निवेदनात केली आहे.

हा सर्व विषय ३० वर्षांपूर्वीच्या घटनांशी संबंधित आहे. श्री. वडगावे हे मूळचे कर्नाटक राज्यातील आहेत, तेथे भटके व विमुक्त असा जातवर्ग नाही, ते महाराष्ट्राचे रहिवासी नाहीत, त्यामुळे त्यांनी दिलेले कार्यकारी दंडाधिकारी, करवीर जि. कोल्हापूर यांच्या सहीचे जातीचे प्रमाणपत्र वैध नाही. श्री वडगावे यांचे जातीचे प्रमाणपत्र व पदोन्नती रद्द करुन त्या पदावर आपली नियुक्ती होणे आवश्यक होते, ती न झाल्यामुळे आपले आर्थिक नुकसान झाले आहे,तसेच कालबध्द पदोन्नती न देऊन अन्याय केला आहे, असा श्री. गायकवाड यांचा आक्षेप आहे. श्री. वडगावे यांच्या बाबतीतील दि. २४.२.१९८४ रोजीचा पदोन्नती आदेश रद्द करुन त्या दिवसापासून आपल्या नियुक्तीचा आदेश व्हावा व संबंधित काळातील नुकसान भरपाई आपल्याला मिळावी अशी श्री. गायकवाड यांची मुख्य मागणी

आहे. १९८६-८७ पासून श्री. गायकवाड विविध पातळ्यांवर हा विषय मांडत आले आहेत. माहितीच्या अधिकाराखालीही त्यांनी अनेक अर्ज केले आहेत. त्या त्या वेळी आवश्यक ती कागदपत्रे व अन्य माहिती विद्यापीठाने त्यांना पुरविली आहे. तसेच अन्य अर्जांच्या संदर्भातही त्या त्या अधिका-यांच्या पातळीवरुन दिलेल्या उत्तरांमध्ये त्यांच्या मूळ मागणीच्या संदर्भातील माहिती त्यांना कळविण्यात आली आहे, असे आयोगाला सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसते.

श्री. गायकवाड हे दि. ३१.५.१९९५ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. श्री वडगावे हे दि ३१.३.१९९५ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत.

श्री. वडगावे यांच्या जात पडताळणीबाबत विद्यापीठाच्या पातळीवरुन १९८६ सालापासून पाठपुरावा चालू असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी. श्री. राजेंद्रकुमार पाटील यांनी आयोगापुढील सुनावणीत विस्ताराने स्पष्ट केले व त्याबाबतची कागदपत्रेही सादर केली. संचालक, आदिवासी संशोधन पुणे, जिल्हाधिकारी ,कोल्हापूर यांच्याकडे हा विषय तपासणीसाठी पाठविण्यात आला होता. त्यांनी कळविल्यानुसार जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्याकडे व जिल्हाधिकाऱ्यांनी कळविल्यानुसार अतिरिक्त आयुक्त (महसूल) तथा अध्यक्ष विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, पुणे यांच्याकडे विद्यापीठाच्या तत्कालीन कुलसचिवांनी जुलै २००२ मध्ये पाठविला आहे, परंतु अद्याप याबाबतचा निर्णय प्राप्त झालेला नाही, असेही श्री. राजेंद्रकुमार पाटील यांच्या निवेदनात नमूद केले आहे. हे सर्व लक्षात घेता विद्यापीठाने वा संबंधित अधिका-यांनी चुकीची व जाणूनबुजून दिशाभूल करणारी माहिती दिल्याचा श्री. गायकवाड यांचा आरोप सिध्द होत नाही. मात्र विभागीय जातपडताळणी समितीकडून पाच वर्षांत तपासणीचा निर्णय होऊ नये, हे अत्यंत अनुचित आहे. तो निर्णय विशिष्ट मुदतीत, त्वरेने झाला असता तर त्या माहितीच्या अभावी उद्‌भवलेला पुढील भाग टळला असता.

श्री. गायकवाड यांनी मागितलेली विद्यापीठाकडील सर्व माहिती, संबंधित कागदपत्रांच्या पूरक प्रतींसह त्यांना देण्यात आली आहे. पदोन्नती व नुकसान भरपाईची मागणी अमान्य झाल्यामुळे पक्षपात होत असल्याचा श्री. गायकवाड यांचा आक्षेप आहे. श्री व डगावे यांच्या पदोन्नतीचा आदेश रद्द करुन

आपली नियुक्ती केल्याचा आदेश काढावा, संबंधित कालावधीसाठी नुकसानभरपाई मिळावी, ही त्यांची मागणी आहे.परंतु माहितीच्या अधिकार कायद्याच्या कक्षेतील हा विषय नाही.

वरील बाबी लक्षात घेता आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

आदेश

अपील फेटाळण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

पुणे
दि. १०.८.२००७

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री. आप्पासाहेब शंकरराव अक्कलकोटे,
२१, सिध्देश्वर नगर, विजापूर रोड,
भारती विद्यापीठ जवळ, सोलापूर

अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, सोलापूर
डॉ. सी.आर. चिलगुंडे

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
प्रशासन अधिकारी, आरोग्य विभाग,
जिल्हा परिषद, सोलापूर
श्री. मानसिंग दादासाहेब सूर्यवंशी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९२ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७/८/२००७ |

| | | |
|---|---|---|
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री. आप्पासाहेब शंकरराव अक्कलकोटे, २१, सिध्देश्वर नगर, विजापूर रोड, भारती विद्यापीठ जवळ, सोलापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर डॉ. सी.आर. चिलगुंडे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर श्री. मानसिंग दादासाहेब सुर्यवंशी | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४.४.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २८.४.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७.५.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०.७.२००६ |
| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती<br><br>औषध निर्माता पदासाठी दि. २२.१.२००६ रोजी घेतलेल्या लेखी परीक्षेचे १. श्रीमती अजिता आदिनाथ बोरगावकर व कु. टोणपे ( श्रीमती जानकी सोपान कांबळे) या उमेदवारांचे पेपर अवलोकण्यास व त्यांच्या छायांकित प्रती मिळाव्यात. लेखी परीक्षेत निवड झालेल्या उमेदवारांची यादी मार्कासह, तोंडी परीक्षेत उमेदवारांना पडलेले मार्कासह यादी | |

## विवेचन

औषध निर्माता पदासाठी दि. २२.१.२००६ रोजी घेतलेल्या लेखी व तोंडी परीक्षेतील निवड झालेल्या उमेदवारांची गुणांसह यादी व दोन उमेदवारांच्या उत्तर पत्रिकांचे अवलोकन व छायांकित प्रती मिळण्याची मागणी अपीलकर्ता श्री. आप्पासाहेब शंकरराव अक्कलकोटे यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे मागितली

होती. या सदंर्भात जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिका-यांच्या पातळीवर मिळालेल्या माहितीने समाधान न झाल्यामुळे श्री. अक्कलकोटे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

श्री. अक्कलकोटे यांनी श्रीमती अजिता आदिनाथ बोरगावकर व कु. टोणपे (श्रीमती जानकी सोपान कांबळे )अशा दोन उमेदवारांच्या उत्तर पत्रिकांचे अवलोकन व छायांकित प्रती मागितल्या होत्या. त्यांच्या अर्जातील तीनही मुद्दयांची माहिती पुरविण्यासाठी रु. ७/- शासकीय कोषागारात भरावे, असे जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर यांनी श्री. अक्कलकोटे यांना कळविले. श्री. अक्कलकोटे यांनी हे शुल्क मनीऑर्डरने पाठविले, ते स्वीकारले गेले नाही. चलनाने शासकीय कोषागारात भरणा करुन चलनाची एक प्रत आरोग्य विभागाला समक्ष आणून दिल्याशिवाय माहिती दिली जाणार नाही, असे प्रशासन अधिका--यांनी पत्रात स्पष्ट केले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये चलनाने पैसे भरण्याची सक्ती करता येणार नाही, असे श्री. अक्कलकोटे यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी यांना कळविले. परंतु सोलापूर जिल्हा परिषदेत रोखीने कोणतेही शुल्क स्वीकारण्याची पध्दत तेव्हा नव्हती. त्यामुळे हे शुल्क स्वीकारले गेले नाही, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगापुढील सुनावणीत स्पष्ट केले. तसेच श्री. अक्कलकोटे यांना हे स्पष्टीकरण करण्यात आले होते, असे त्यांनी नमूद केले. श्री. अक्कलकोटे यांनी आपण व्यक्तिशः माहिती स्वीकारणार असल्याचे नमूद केले असल्यामुळे ती माहिती त्यांना टपालाने पाठविली नाही, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी सांगितले.

दरम्यान श्री. अक्कलकोटे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे अपील केले. केंद्रिय माहिती आयोगाने दि. ६.२.२००६ रोजी दिलेल्या निर्णयानुसार मूल्यांकन केलेल्या उत्तर पत्रिकांच्या प्रती उपलब्ध करुन देता येणार नाहीत, असे कारण देऊन त्यांनी श्री. अक्कलकोटे यांचे अपील फेटाळले. उत्तर पत्रिका देण्याच्या संदर्भातील जिल्हा परिषदेच्या भूमिकेविषयीचा गोंधळ यातून स्पष्ट होतो. अतिरिक्त शुल्क भरुन ही माहिती घेऊन जाण्यास जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी दि. २८.४.२००६ रोजी कळवितात आणि ‘परीक्षा पध्दती आणि उमेदवारांची निवड ही अत्यंत गोपनीय प्रक्रिया असल्याने उत्तरपत्रिका देणे

माहिती अधिकाराच्या कक्षेत येत नाही, असा निर्णय केंद्रिय माहिती आयोगाने दिला,' हे कारण नमूद करुन त्या आधारे अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांनी दि. १०.७.२००६ रोजी अपील फेटाळतात. परंतु मार्च / एप्रिल २००६ मध्ये याच अधिका-यांनी दोन उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती माहितीचा अधिकार कायद्याखाली दिल्या आहेत. या उत्तर पत्रिकांच्या प्रती मिळाल्यामुळे त्यातील गैरप्रकार उघड होऊन त्याला आव्हान देणे शक्य झाले आहे, असे श्री अक्कलकोटे यांचे म्हणणे आहे. श्रीमती जानकी सोपान कांबळे (अर्जात उल्लेखित श्रीमती टोणपे) व श्रीमती अजिता आदिनाथ बोरगावकर अशी त्यांची नावे आहेत. 'जिल्हा परिषदेच्या वर्ग - ३ व वर्ग - ४ मधील भरतीकरिता घेण्यात आलेल्या लेखी परीक्षांच्या उत्तर पत्रिकांच्या छायांकित प्रती, पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द केल्यावर ५ दिवसांच्या आंत संबंधित उमेदवारांनी मागणी केल्यास, रु. २००/- इतके शुल्क आकारुन त्यांना देण्यात याव्यात,' असे श्री. प्रकाश हिर्लेकर, उप सचिव, महाराष्ट्र शासन यांनी दि. २२ जून २००६ रोजी सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांना कळविले आहे. हेही येथे लक्षात घेणे आवश्यक आहे.

वरील पार्श्वभूमी व उपलब्ध कागदपत्रे लक्षात घेता, उत्तर पत्रिकांच्या छायांकित प्रती देण्याबाबत अधिका-यांचा गोंधळ होणे स्वाभाविक दिसते. मात्र श्री. अक्कलकोटे हे स्वत: परीक्षार्थी नसून त्यांनी इतरांच्या उत्तर पत्रिकांच्या छायांकित प्रती मागितलेल्या आहेत. त्रयस्थ उमेदवारांच्या उत्तर पत्रिकांच्या छायांकित प्रती त्यांना देता येणार नाहीत. संबंधित उमेदवारांचे 'ना हरकत पत्र' हो त्यांनी अर्जासोबत दिलेले नाही. मात्र विषयाचे स्वरुप लक्षात घेता संबंधित उमेदवारांनी मागणी केल्यास त्यांच्या उत्तर पत्रिकांच्या छायांकित प्रती त्यांना मागणीनुसार दिल्या जाणे आवश्यक आहे.

उभय बाजूंची निवेदने व संबंधित कागदपत्रे यांचा विचार करुन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

१. अपील अंशत: मान्य.

२. श्री. अक्कलकोटे यांना हवी असलेली उर्वरित माहिती हा आदेश मिळाल्यापासून सात दिवसांत द्यावी.

३. 'पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द केल्यावर संबंधित उमेदवारांनी मागणी केल्यास,' असा उल्लेख उप सचिव यांच्या पत्रात असला तरी संबंधित माहितीबाबत झालेला विलंब लक्षात घेऊन संबंधित उमेदवारांनी मागणी केल्यास त्याचा अर्ज मिळाल्यापासून एक आठवड्यात त्यांच्या उत्तर पत्रिकांच्या छायांकित प्रती त्यांना द्याव्यात. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची ही जबाबदारी राहील. विलंबास कारण ठरलेली विषयातील गुंतागुंत लक्षात घेता उप सचिवांच्या पत्रात नमूद केलेले शुल्क मात्र त्याकरिता आकारावे.

४. श्री. अक्कलकोटे यांनी संबंधित दोन उमेदवारांचे (श्रीमती अजिता आदिनाथ बोरगावकर व श्रीमती टोणपे ) 'ना हरकत पत्र' हा आदेश मिळाल्यापासून एक आठवड्यात जन माहिती अधिका-यांना सादर करावे. मात्र उत्तर पत्रिकांच्या छायांकित प्रती श्री. अक्कलकोटे यांना देण्यात येऊ नयेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

पुणे
दि. १४.८.२००७

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

---

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे.१

श्री.भिमसेन धर्मराज चव्हाण,
संपादक 'झेप' यांचे कार्यालय, — अपीलकर्ता
अब्दुलहमीद शॉपिंग सेंटर,
इंदापूर, जि. पुणे

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा
१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), — उत्तरवादी
जिल्हा परिषद, सोलापूर

२. समाज कल्याण अधिकारी (गट अ )
समाजकल्याण, जिल्हा परिषद, सोलापूर
तर्फे प्रतिनिधी श्री. मनोहर कावळे

जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक व संस्थापक,

१. अजितदादा पवार हायस्कूल, शिराळ (टें) ता.माढा, जि.सोलापूर
२. विलासराव देशमुख हायस्कूल, उपरी, ता.पंढरपूर, जि.सोलापूर
श्री. तानाजी धोंडिराम साळुंखे
३. डॉ. पद्मसिंह पाटील हायस्कूल, महिम, ता.सांगोला,जि.सोलापूर
श्री. दिलीप मारुती चौगुले
४. खिलारवाडी हायस्कूल, खिलारवाडी, ता.सांगोला, जि. सोलापूर
श्री. काशीनाथ माणिक मुटकुळे

५. विनायक पाटील हायस्कूल, परिते, ता. माढा, जि. सोलापूर
श्री. सुकदेव मारुती चव्हाण

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १४.६.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.भिमसेन धर्मराज चव्हाण, संपादक 'झेप' यांचे कार्यालय, अब्दुलहमीद शॉपिंग सेंटर, इंदापूर, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा समाज कल्याण अधिकारी (गट अ )
समाजकल्याण, जिल्हा परिषद, सोलापूर
तर्फे प्रतिनिधी श्री. मनोहर कावळे

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक /संस्थापक

१. अजितदादा पवार हायस्कूल, शिराळ (टें) ता.माढा, जि.सोलापूर
तर्फे प्रतिनिधी

२. विलासराव देशमुख हायस्कूल, उपरी, ता.पंढरपूर, जि.सोलापूर
श्री. तानाजी धोंडिराम साळुंखे

३. डॉ. पद्मसिंह पाटील हायस्कूल, महिम, ता.सांगोला,जि.सोलापूर
श्री. दिलीप मारुती चौगुले

४. खिलारवाडी हायस्कूल, खिलारवाडी, ता.सांगोला, जि. सोलापूर
श्री. काशीनाथ माणिक मुटकुळे

५. विनायक पाटील हायस्कूल, परिते, ता. माढा, जि. सोलापूर
श्री. सुकदेव मारुती चव्हाण

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२.५.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २१.३.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.९.२००५ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :**

अस्वच्छ व्यवसाय करणाऱ्यांच्या मुला - मुलींना विनायकराव पाटील विद्यालय, परिते मध्ये तसेच शरदचंद्र पवार शिक्षण प्रसारक मंडळ पळशी संचलित शिराळ (टें), उपरी, महिम, खिलारवाडी प्रशालेत दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती व कर्मचाऱ्यांकडून प्रतिमहिना किती रकमेची देणगी स्वखुशीने व सक्तीने दिली/घेतली जाते त्याची माहिती

## विवेचन

अपंग व अस्वच्छ व्यवसाय करणाऱ्यांच्या मुला - मुलींना इ.सन १९९९ ते २००४ या कालावधीत दिल्या गेलेल्या शिष्यवृत्तीबाबतची माहिती अपीलकर्ता श्री. भिमसेन धर्मराज चव्हाण यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, तसेच समाज कल्याण अधिकारी (गट अ), जिल्हा परिषद, सोलापूर, यांच्याकडे मागितली होती. १. अजितदादा पवार हायस्कूल, शिराळ (टें) ता.माढा, २. विलासराव देशमुख हायस्कूल, उपरी, ता.पंढरपूर, ३. डॉ. पद्मसिंह पाटील हायस्कूल, महिम, ता.सांगोला, ४. खिलारवाडी हायस्कूल, खिलारवाडी, ता.सांगोला, ५. विनायक पाटील हायस्कूल, परिते, ता. माढा, जि. सोलापूर या पाच शाळांबाबत त्यांना ही माहिती हवी होती. समाज कल्याण विभागाकडून या शाळांना प्रतिवर्षी अनुदान मिळालेली रक्कम व विद्यार्थ्यांच्या जातीसह नावे या बरोबरच 'आमच्या कार्यालयाकडे निनावी फोनद्वारे आलेल्या तक्रारीवरुन कर्मचाऱ्यांकडून संस्थेस प्रतिमहा किती रकमेची देगणी सक्तीने व स्वखुशीने दिली जाते, त्याबाबत तपशील आवश्यक,' असे श्री. चव्हाण यांनी महाराष्ट्र माहितीचा अधिकार २००२ अन्वये केलेल्या या अर्जात नमूद केले होते. प्रत्येक संस्थेकडे त्यांनी स्वतंत्र अर्ज केले होते व 'सदर विद्यालयातील आर्थिक गैरव्यवहार साप्ताहिक 'झेप' मध्ये प्रकाशित करण्यासाठी जनहितार्थ वरील माहिती आवश्यक आहे,' असे त्यांनी म्हटले आहे. इ.सन १९९४ ते २००५ या शैक्षणिक वर्षामधील संबंधित विद्यालयांची जमा - नांवे पत्रके, बँक पासबुक आदींच्या छायांकित प्रती अशी माहिती त्यांनी मागितली होती. ही माहिती संबंधित जन माहिती अधिकाऱ्यांनी सुमारे तीन महिन्यांनी पाठविली. दि. १२.८.२००५ ते ७.१०.२००५ या कालावधीत

श्री. चव्हाण यांनी केलेल्या प्रत्येकी दोन स्वतंत्र अर्जाद्वारे ही माहिती मागितली होती. विहित मुदतीत माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे अपील केले. संबंधित शाळांचे मुख्याध्यापक व अध्यक्ष यांना उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांनी संबंधित माहिती श्री. चव्हाण यांना देण्याचे आदेश दिले. परंतु अपुरी व चुकीची माहिती मिळाल्याच्या कारणावरुन श्री. चव्हाण यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

श्री. चव्हाण यांनी मागितलेली माहिती सुमारे १० वर्षांच्या काळातील असून ती संकलित करण्यास लागलेल्या अवधीमुळे विलंब झाला. दि. २१.३.२००६ रोजी श्री. चव्हाण यांना प्रत्यक्षात उपलब्ध असलेली सर्व माहिती देण्यात आली आहे, असे सर्व जन माहिती अधिकारी त मुख्याध्यापकांनी आयोगापुढे नमूद केले. दि. २७.७.२००५ रोजी उपरोक्त माहिती श्री. चव्हाण यांना पुरविल्याचे समाज कल्याण अधिकारी, (गट अ) यांनी नमूद केले. वरील पाच शाळांमधील विनायक पाटील हायस्कूल, परिते ही शाळा महाराष्ट्र शिक्षण संस्था, पंढरपूर या संस्थेची असून इतर चार शाळा 'मा. शरदचद्रंजी पवार शिक्षण मंडळ,' पळशी, ता. पंढरपूर या संस्थेच्या आहेत. या शाळांमध्ये संगनमताने विविध मार्गांनी होत असलेल्या गैरव्यवहाराबाबत आपल्याला माहिती हवी आहे व कोणत्याही प्रकारची माहिती देण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ केली जात आहे, असे श्री. चव्हाण यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलात म्हटले आहे. संबंधित शाळांच्या जन माहिती अधिकाऱ्यांनी दि. २१.३.२००६ रोजी माहिती दिली असली तरी त्यातील अनेक छायांकित प्रतींमध्ये काही भाग सुस्पष्ट नाही, त्यामुळे तो वाचताही येत नाही, म्हणजे ती माहिती प्रत्यक्षात मिळाली नाही, असे श्री. चव्हाण यांनी आयोगापुढे नमूद केले. 'कोणतीही माहिती टाळण्याचा आपला उद्देश नाही, तपशीलवार माहिती कोणतेही शुल्क न घेता दिली आहे. काही प्रती सुस्पष्ट नसल्यास नव्याने त्वरित देऊ,' असे उपस्थित जन माहिती अधिकाऱ्यांनी सांगितले. तसेच आणखी काही माहिती आवश्यक असल्यास तशी मागणी केल्यास ती श्री. चव्हाण यांना देण्याची व्यवस्था केली जाईल, असे आपण त्याच वेळी कळविले असल्याचेही या मुख्याध्यापकांनी स्पष्ट केले. श्री. चव्हाण वारंवार गैरव्यवहाराचे आरोप करुन माहितीची मागणी त्रास देण्याच्या हेतूने करतात, अशी तक्रार उपस्थित मुख्याध्यापकांनी

केली. त्रास देण्याचा आपला कोणताही उद्देश नसून गैरव्यवहाराची सत्य माहिती जनतेपुढे आणण्यासाठी आपण अर्ज करीत असल्याचे प्रतिपादन श्री. चव्हाण यांनी केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे व निवेदने यांचा विचार करता आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

**आदेश**

१. अपील अमान्य.

२. पूर्वी दिलेल्या माहितीच्या सुवाच्य अशा प्रती अपीलकर्त्याला सर्व जन माहिती अधिकाऱ्यांनी निःशुल्क पुरवाव्या.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे विभाग, पुणे**

**पुणे**
**दि. ३०.८.२००७**

राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री. चांद दगडु तांबोळी,
मु.पो.दारफळ (सीना),
ता. माढा, जि. सोलापूर

अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,
सोलापूर, जि. सोलापूर

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
सरव्यवस्थापक,
सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.
सोलापूर, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७/८/२००७ |

| | | |
|---|---|---|
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री. चांद दगडु तांबोळी, मु.पो.दारफळ (सीना) ता. माढा, जि. सोलापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, सोलापूर, जि. सोलापूर श्री. अ.ज.भिल्लारे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सरव्यवस्थापक, सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. सोलापूर, जि. सोलापूर श्री. प्रतापसिंह बाबूराव चव्हाण | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३.२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.३.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ५.५.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १९.६.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :**<br><br>४४१ खात्यामधील दि. ३०.११.२००२ च्या काढलेल्या रकमेची छायांकित प्रत (पाठपोट), दि. १८.३.२००४ रोजीचे श्री. जहांगीर चांद तांबोळी यांचे विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था दारफळ (सीना) क्र.१,२ व ३ सोसायटीचे नो ड्यूज प्रमाणपत्रे छायांकित प्रतीत मिळावी | |

## विवेचन

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित,शाखा दारफळ (सीना), ता. माढा, जि. सोलापूर येथील दारफळ विविध कार्यकारी सेवा सह. संस्था क्र.१, २ व ३ च्या श्री. जहांगीर चांद तांबोळी यांच्या दि. १८.३.२००४ च्या बेबाकी (No dues) प्रमाणपत्रांची मागणी अपीलकर्ता श्री. चांद दगडू तांबोळी यांनी जन माहिती अधिकारी तथा सरव्यवस्थापक, सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या. सोलापूर यांच्याकडे केली होती. या माहितीसाठी अतिरिक्त शुल्क रु. ६५/- भरणा करावे, असे जन माहिती अधिका-यांनी श्री. तांबोळी यांना कळविले. ही रक्कम भरल्यानंतरही बँकेकडून आपल्याला संबंधित प्रमाणपत्रे मिळाली नाहीत. दि. १८.३.२००४ रोजी आपण स्वतः

बेबाकी दाखला बँकेत सादर केला होता व बँकेनेही श्री. जहांगीर चांद तांबोळी यांच्याकडे येणे बाकी नाही असा दाखला दिला आहे, तरीही त्याची प्रत आपल्याला दिली जात नाही ,अशी श्री. तांबोळी यांची तक्रार आहे. बँकेने सोसायटी क्र. १ व ३ चे बेबाकी दाखले दिले, परंतु सोसायटी क्र. २ चा दाखला दिला नाही, त्यामुळे श्री. तांबोळी यांनी अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर यांच्याकडे अपील केले. दारफळ (सीना), ता. माढा या गावात तीन विविध कार्यकारी सेवा सोसायट्या आहेत. श्री. तांबोळी यांनी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, दारफळ (सीना), शाखेकडे बेबाकी दाखला मागण्याचा जो अर्ज केला त्यासोबत सोसायटी क्र. १ व ३ चे दाखले जोडले होते, त्यानुसार त्यांना बेबाकी दाखला देण्यात आला आहे. मात्र त्यांचे चिरंजीव श्री. जहांगीर चांद तांबोळी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था दारफळ, सोसायटी क्र.२ या संस्थेचे थकबाकीदार असून त्यांच्याकडे रक्कम रु. २६,५००/- येणे बाकी आहे व तसा संस्थेचा दाखलाही आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर यांनी प्रथम अपिलाच्या निर्णयात नमूद केले आहे.

'बँक शाखा दारफळ (सीना) यांचेकडून नोड्यूज दाखला देतेवेळी सदर सोसायटी क्र.२ चा दाखला श्री. तांबोळी यांचेकडून मागणी करणे अनावधानाने राहून गेले. तसेच अपीलकर्ते यांनी बँक शाखेकडून अर्धवट माहितीचे आधारे बँकेची दिशाभूल करुन नोड्यूज दाखला मिळविलेला आहे व सदर दाखल्याचे आधारे दारफळ (सीना) विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी क्र.२ ची कर्जबाकीच नाही असे भासविण्याचा प्रयत्न करीत आहे, असे बँकेच्या लेखी खुलाशात म्हटले आहे,' असेही अपिलीय प्राधिका-यांच्या निर्णयपत्रात नमूद केले आहे. त्यांचे अपील फेटाळल्यामुळे श्री. चांद दगडू तांबोळी यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

श्री. तांबोळी यांनी दि. १३.२.२००६ रोजी माहिती - मागणीचा अर्ज केला. त्यांनी प्रथम अपील दि. १२.५.२००६ रोजी केले, ते फेटाळण्याचा आदेश अपिलीय प्राधिका-यांनी दि. १९.६.२००६ रोजी दिला. अपीलकर्त्याने विहित मुदतीत अपील केले नव्हते, असे अपिलीय प्राधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. आपल्या मुलाकडून कोणतीही येणे बाकी नाही, आपण सादर केलेला सोसायटी क्र.२ चा दाखला बँक इन्स्पेक्टर व सोसायटी सचीव यांनी गायब केला आहे. मुलाच्या नावे दाखविलेले कर्ज प्रत्यक्षात आपल्याला मिळालेले नाही. मुलाच्या नावावर २ एकर कोरडवाहू क्षेत्र

असून त्याच्या उता-यावरही बोजा दाखविलेला नाही. संबंधित रक्कम आपल्याला न मिळताच हडप केलेली आहे, असे श्री. चांद तांबोळी यांनी आयोगापुढे केलेल्या लेखी व तोंडी निवेदनात म्हटले आहे. मात्र श्री. जहांगीर तांबोळी यांच्याकडील थकबाकीबाबतची सर्व कागदपत्रे बँकेकडे असून या कर्जाची वसुली केली जाऊ नये म्हणून श्री. चांद तांबोळी अशा प्रकारचे प्रयत्न विविध अर्जांमधून करीत आहेत, असे जन माहिती अधिकारी श्री. प्रतापसिंह बाबूराव चव्हाण यांनी सांगितले. श्री. जहांगीर तांबोळी यांच्याकडे थकबाकी आहे याला सहाय्यक निबंधक, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था सोलापूर श्री. अ.ज. भिल्लारे यांनी दुजोरा दिला. सोसायटी क्र.२ चा दाखला श्री. तांबोळी यांच्याकडून मागण्याचा 'अनवधानाने' कसा राहून गेला, अर्धवट माहितीच्या आधारे बँकेची दिशाभूल ते कशी करु शकले, बँकेची यंत्रणा याबाबत का जागरुक नव्हती, याचे स्पष्टीकर उपस्थित अधिकारी देऊ शकले नाहीत. मात्र कर्ज नसेल तर बँकेकडे कर्जरोखा, वचनचिठ्ठी इत्यादी कागदपत्रे राहू कशी दिली, याचा खुलासा श्री. तांबोळी करु शकले नाहीत. श्री. जहांगीर चांद तांबोळी यांच्याकडे रु. २६,५००/- थकबाकी असल्याचे नमूद करणारा सचीव व बँक इन्स्पेक्टर विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी, दारफळ (सीना), ता.माढा यांचा दि. १८.३.२००४ चा दाखलाही आयोगाला सादर केलेल्या कागदपत्रात समाविष्ट आहे. तसेच त्यांना मंजूर झालेली कर्ज-रक्कम, त्यांनी पैसे काढल्याच्या पावत्यांच्या छायांकित प्रती आदि कागदपत्रेही त्यात समाविष्ट आहेत. संपूर्ण रक्कम आपल्या मुलाने फेडली असल्याचे श्री. तांबोळी यांचे म्हणणे आहे. परंतु त्याची पावती अथवा कोणतीही पूरक कागदपत्रे त्यांनी सादर केलेली नाहीत. प्रत्यक्षात आपल्या कर्जच मिळाले नाही, येथपासून त्याची पूर्ण फेड केली आहे, येथपर्यंत कोणत्याही विधानाला पुष्टी देणारा पुरावा श्री. तांबोळी यांनी कागदपत्रात सादर केलेला नाही. त्यांच्याकडे थकबाकी आहे, असे प्रतिपादन श्री. चव्हाण व श्री. भिल्लारे यांनी सातत्याने केले.

कर्ज मिळाले की नाही, त्याची परतफेड झाली की नाही, आदि संदर्भ माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कक्षेत येणारे नाहीत. परंतु त्याबाबत दिली जाणारी माहिती योग्य आहे की नाही हे स्पष्ट होण्यासाठी वरील प्रश्नांचे निराकरण होणे आवश्यक आहे. म्हणून याबाबतची चौकशी होऊन आयोगापुढे वस्तुनिष्ठ माहिती येणे गरजेचे आहे. श्री. तांबोळी यांना अपुरी / दिशाभूल करणारी /

चुकीची माहिती दिली गेली का, तसेच श्री. तांबोळी माहितीबाबत चुकीची / दिशाभूल करणारी विधाने करीत आहेत का, हे अशा चौकशीतूनच स्पष्ट होईल.

उभय बाजूंची निवेदने, सादर केलेली कागदपत्रे यांचा विचार करुन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

१. श्री. चांद दगडु तांबोळी यांना मिळालेले बेबाकी दाखले, दारफळ (सीना) सोसायटी क्र. २ मधील श्री. जहांगीर चांद तांबोळी यांच्या कर्जाबाबतची वस्तुस्थिती याबाबत चौकशी करुन सहाय्यक निबंधक, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, सोलापूर श्री. अ.ज. भिल्लारे यांनी हा आदेश मिळाल्यापासून पंधरा दिवसात आयोगाला अहवाल सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

पुणे
दि. १३.८.२००७

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री. रतनकुमार सुखदेव शिंदे
रा. यशोसुख निवास, सर्व्हे नं.६०६/१०६, — अपीलकर्ता
सी.एम.ई.सोसायटीमागे,
नवी सांगवी, पुणे-२७

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
सह संचालक (शिक्षण), — उत्तरवादी
समाज कल्याण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१
श्री. लहू सदाशिव माळी

जन माहिती अधिकारी तथा
उप संचालक (नाहसं),
समाज कल्याण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१
श्री. आर. जी. गोसावी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १४.६.२००७ |

३. उपस्थित

**अपीलकर्ता** श्री. रतनकुमार सुखदेव शिंदे
रा. यशोसुख निवास, सर्व्हे नं.६०६/१०६,
सी. एम.ई.सोसायटीमागे, नवी सांगवी, पुणे-२७

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह संचालक (शिक्षण),
समाज कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१
श्री. लहू सदाशिव माळी

**जन माहिती अधिकारी** तथा उप संचालक (नाहसं),
समाज कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१
श्री. आर. जी. गोसावी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.४.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १९.४.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९.४.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ५.५.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :** सर्व्हे नं. ६६/१ व ६ सी.एम.ई. सोसायटीमागे, नवी सांगवी या जागेवर एकता अपार्टमेंट या संस्थेने अतिक्रमण केले आहे. याबाबत तक्रारी दिलेल्या आहेत, सदर तक्रारी बाबत कोणती कार्यवाही केली याची माहिती | |

## विवेचन

आपल्या राहत्या घराच्या जागेवर तारेचे कुंपण घालून शेजा-यांनी अतिक्रमण केल्याची तक्रार श्री. शिंदे यांनी संचालक, समाज कल्याण (ना. ह. सं.) महाराष्ट्र राज्य , पुणे १ यांच्याकडे केली होती.

आपण वारंवार केलेल्या या तक्रारीबाबत काय कार्यवाही झाली, याची माहिती जन माहिती अधिकारी तथा उप संचालक, समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे मागितली होती. परंतु 'आपली लेखी तक्रार या कार्यालयास प्राप्त झाली नाही. त्यामुळे त्यावर काय कार्यवाही केली, ही माहिती देता येत नाही,' असे उप संचालक, समाज कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी श्री. शिंदे यांना कळविले. तसेच जागेवरील अतिक्रमणाचा विषय महापालिकेच्या कक्षेतील असल्यामुळे अतिक्रमण हटविण्याबाबत पुणे महापालिकेशी संपर्क साधावा, असे कळवून त्यांचा अर्ज परत पाठविला. त्याविरुध्द त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सह संचालक (शिक्षण ), समाज कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे अपील केले. त्यांनी जन माहिती अधिकाऱ्यांचा निर्णय कायम केला. त्याविरुध्द श्री. शिंदे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

श्री. शिंदे हे अनुसूचित जातीतील असून आपल्या राहत्या घराच्या जागेवर एकता अपार्टमेंट या संस्थेने अतिक्रमण केले असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. त्या सोसायटीतील लोकांपासून आपल्या जिवाला धोका आहे अशी तक्रार त्यांनी समाज कल्याण संचालकांप्रमाणेच पोलिसांकडेही केलेली आहे. जागेवरील अतिक्रमण व संबंधितांकडून जिवाला धोका असणे हे दोन्ही विषय महत्वाचे असले तरी समाजकल्याण संचालनालयाच्या कक्षेतील नाहीत, असे श्री. आर.जी.गोसावी, उप संचालक, समाज कल्याण व श्री. लहू सदाशिव माळी, सह संचालक समाजकल्याण, पुणे यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. तसेच अतिक्रमणाबाबत श्री. शिंदे यांनी महापालिकेशी संपर्क साधावा व संबंधित सोसायटीमधील लोकांपासून जिवाला धोका असण्यास व ते मारहाण करण्याची शक्यता वाटत असल्यास त्यांनी अनुसूचित जाती जमाती (अत्याचार प्रतिबंधक ) अधिनियम १९८२ नुसार त्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करावा, असे स्पष्ट केल्याचे त्यांनी नमूद केले. परंतु आपण मागासवर्गीय असल्यामुळे समाजकल्याण खात्याने ही कारवाई केली पाहिजे, असा श्री. शिंदे यांचा आग्रह आहे. वेगवेगळ्या पत्रांद्वारे ते ही मागणी करीत असून आयोगापुढेही त्यांनी ते म्हणणे मांडले. कायदेशीर कार्यकक्षेचा बारकावा अर्जदाराच्या लक्षात येत नसल्याचे व मान्य करण्यास अर्जदार तयार नसल्याचे सुनावणीतील चर्चेत स्पष्ट झाले. मात्र अर्जदाराच्या तक्रारी आल्या नाहीत हे अधिकाऱ्यांचे म्हणणे चुकीचे आहे, हे अर्जदाराने सादर केलेल्या तक्रारीच्या प्रतींवरुन स्पष्ट होते. या तक्रारीबाबत उप

संचालक (ना. ह. सं.), समाज कल्याण संचालनालय व त्यांच्या आदेशाुसार विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, पुणे जिल्हा यांनी दखल घेतल्याचेही कागदपत्रांवरुन दिसून येते. विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, पुणे जिल्हा यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन चौकशी करुन संचालनालयाला अहवाल सादर करावा, असा आदेश उप संचालक (ना. ह. सं.), समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दि. १३.५.२००३ रोजी, तसेच दि. १५.१०.२००४ रोजीही पुन्हा दिला होता. या चौकशीच्या अहवालाची प्रत अपीलकर्त्याला देता येणे शक्य आहे.

वरील पार्श्वभूमी व सर्व बाबींचा विचार करता आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

१. अपील अमान्य.

२. विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, पुणे जिल्हा, पुणे यांनी केलेल्या चौकशीच्या अहवालाची प्रत अपीलकर्त्याला विनाशुल्क द्यावी.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे विभाग, पुणे

पुणे
दि. २३.८.२००७

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री. नरेश बनारसीदास अगरवाल,
सर्व्हे क्र. ११९, कळस, आळंदीरोड, — अपीलकर्ता
पुणे ४११ ००१५

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
नगर अभियंता, — उत्तरवादी
पुणे महानगरपालिका, पुणे ५
श्री. प्रशांत मधुकर वाघमारे

जन माहिती अधिकारी तथा
विकास अभियंता,
पुणे महानगरपालिका, पुणे ५
श्री. शांताराम खंडेराव थोरात

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३५ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १४.६.२००७ |

३ उपस्थित

**अपीलकर्ता** श्री. नरेश बनारसीदास अगरवाल,
सर्व्हे क्र. ११९, कळस, आळंदीरोड, पुणे ४११ ००१५

अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता,
पुणे महानगरपालिका, पुणे ५ श्री. प्रशांत मधुकर वाघमारे

जन माहिती अधिकारी तथा विकास अभियंता,
पुणे महानगरपालिका, पुणे ५ श्री. शांताराम खंडेराव थोरात

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १.२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०.२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २७.३.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १८.४.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :**

मौजे कळस येथील सर्व्हे क्र. ११३, प्लॉट क्र. ९ व १० या जागेत असलेल्या लोकांना पुणे महानगरपालिका बांधकाम विभागाने ४७८(१) प्रमाणे दि. १६.६.१९९४ व १३.७.१९९४ रोजी दिलेल्या एकूण ५ नोटिसांचे बाबत

## विवेचन

मौजे कळस येथील स.क्र.११३, प्लॉट क्र. ९ व १० या जागेत असलेल्या लोकांना पुणे महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाने दि. १६.६.१९९४ व १३.७.१९९४ रोजी पाच नोटिसा दिल्या. त्याबाबतची माहिती अपीलकर्ता श्री. नरेश बनारसीदास अगरवाल यांनी जन माहिती अधिकारी तथा उप आयुक्त (जनरल), पुणे महानगरपालिका यांच्याकडे मागितली होती. 'सदर नोटीसांच्या ऑफिस कॉपींचा शोध घेणेचे काम चालू असून त्यास काही कालावधी लागणार आहे, तसेच नोटीस उपलब्ध झाल्यावर आपणास तात्काळ कळविणेत येईल,' असे जन माहिती अधिकारी तथा विकास अभियंता, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी श्री. अगरवाल यांना

दि.२४.२.२००६ रोजी कळविले. दि. १.३.२००६ रोजी सहाय्यक अभियंता क्र.३, पुणे महानगरपालिका यांनी 'नोटिसांचा शोध घेणे सुरु आहे, सदर प्रकरण जुने असल्याने शोधण्यास वेळ लागणार आहे, प्रकरण उपलब्ध झालेवर आपणास कळविणेत येईल, याची नोंद घ्यावी,' असे कळविले. श्री. अगरवाल यांनी अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता यांच्याकडे अपील केले. दि. ५.४.२००६ रोजी त्याची सुनावणी होऊन अपिलीय प्राधिका-यांनी दि. १८.४.२००६ रोजी दिलेला निर्णय श्री. अगरवाल यांना दि. ४.५.२००६ रोजी मिळाला. 'अपिलार्थी यांनी सदर विषयाबाबत संपूर्ण माहिती देऊन सर्व विभागाकडून जागेची मोजणी करुन घेणे' असे अपिलीय प्राधिका-यांच्या आदेशात म्हटले आहे. श्री. अगरवाल यांनी मागितलेल्या नोटिसांच्या प्रतींबाबत त्यात कोणताही उल्लेख नाही. या आदेशाविरुध्द श्री. अगरवाल यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री. अगरवाल यांनी दि. १.२.२००६ रोजी मूळ अर्ज केला आहे. त्यांनी मागितलेली माहिती सन १९९४ मधील आहे. 'परंतु उपलब्ध झाल्यावर कळविण्यात येईल,' असे ढोबळ उत्तर अधिका-यांनी दिले आहे. तसेच अपिलीय प्राधिका-यांनी मूळ मागणीबाबत कोणताही निर्णय दिलेला नाही. माहिती उपलब्ध होण्याबाबत कोणतीही कालमर्यादा अधिका-यांनी स्पष्ट केलेली नाही व स्वीकारलेली नाही. श्री. अगरवाल यांच्या अर्जामध्ये व अपिलांच्या जोडपत्रांमध्ये मागितलेल्या माहितीचा उल्लेख 'पाच नोटिसांचे बाबत' असा आहे. म्हणजे नेमकी कोणती माहिती त्यांना हवी आहे हे अर्जावरुन स्पष्ट होत नाही. परंतु पाच नोटिसांच्या छायांकित प्रती त्यांना हव्या असल्याचे जन माहिती अधिका-यांच्या व अपिलीय प्राधिका-यांच्या पत्रांमधून स्पष्ट होते. त्यांनी नमूद केलेली कागदपत्रे क वर्गात येतात व क वर्गातील कागदपत्रे पाच वर्षांनी नष्ट केली जातात, असे जन माहिती अधिकारी तथा विकास अभियंता, पुणे महानगरपालिका श्री. शांताराम खंडेराव थोरात व अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता, पुणे महानगरपालिका श्री. प्रशांत मधुकर वाघमारे यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. संबंधित नोटिसांचा शोध घेण्याचा प्रयत्न गांभीर्याने केला गेल्याचेही प्रतिपादन त्यांनी केले.. परंतु तरीही श्री. अगरवाल

यांना हव्या असलेल्या नोटिसांच्या प्रती वर्षभराचा कालावधी उलटून गेला तरी मिळालेल्या नाहीत हे स्पष्ट आहे.

मौजे कळस येथील स.क्र.११३, प्लॉट क्र.९ व १० च्या संदर्भात श्री. अगरवाल सातत्याने व विविध मार्गानी प्रश्न उपस्थित करीत आहेत. या विषयासंदर्भातील न्यायालयातील अपिलाचा निकाल २००० साली लागला आहे. संबंधित नोटिसांच्या प्रती न्यायालयात दाखल केलेल्या कागदपत्रातून उपलब्ध करुन देणे शक्य आहे हे सुनावणीत स्पष्ट झाले. असा प्रयत्न महापालिकेच्या वतीने केला गेलेला नाही. न्यायालयातून नोटिसांच्या प्रती मागवून श्री. अगरवाल यांना देता येतील, हे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी मान्य केले.

उभय बाजूंच्या निवेदनांचा विचार करुन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

१. अपील मान्य.

२. अपीलकर्त्याला हव्या असलेल्या नोटिसांच्या प्रती दि. १५.९.२००७ पर्यंत जन माहिती अधिका-यांनी उपलब्ध करुन द्याव्यात. अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी याप्रमाणे कार्यवाही होण्याची दक्षता घेऊन पूर्तता अहवाल आयोगाला पाठवावा.

**पुणे**
**दिनांक :- ३१/८/२००७**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे विभाग, पुणे**